महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ अधिनियम १९६० मधील कलम २६ (२) मधील तरतूदीनुसार एकल न्यायाधिरण स्थापित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक :- न्यायाप्र २०१७/प्र.क्र. १४९ /उद्योग-६
मंत्रालय, मुंबई :- ४०० ०३२
दिनांक :- १६ फेब्रुवारी २०१८

प्रस्तावना

महाराष्ट्रातील खादी व ग्रामोद्योग विकासाच्या कामासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना सन १९६२ मध्ये मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार केलेली आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार मंडळाकडून ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येतो. त्याचप्रमाणे खादी व ग्रामोद्योग आयोगाच्या व राज्य शासनाच्या योजनांची अंमलबजावणी मंडळ करीत असते. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत श्रीमती रत्नप्रभादेवी मोहीते पाटील हॅंड मेड पेपर महिला व्यावसायिक खादी ग्रामोद्योग सहकारी संस्था कोंडर पट्टा, माळशिरस जि. सोलापुर या संस्थेस कंन्सोर्टियम बॅंक फायनान्स या योजनेअंतर्गत रु.२१,३३,९००/- इतके कर्ज मंजूर करण्यात आले होते. सदर संस्थेने थकीत कर्जाबाबत दिनांक १५/२/२०१६ रोजी विचारणा केली असता मंडळाकडून रु.९,६३,४८४/- इतके कर्ज थकीत असल्याचे सूचित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून दिनांक २४/६/२०१६ रोजी रुपये १८,०७,४२४/- इतकी रक्कम वसूल करण्यासाठी रिकव्हरी प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी ग्रामोदयोग मंडळ, मुंबई यांनी वादी श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील हॅंड मेड पेपर महिला व्यावसायिक खादी ग्रामोद्योग सहकारी संस्था कोंडर पट्टा, माळशिरस जि. सोलापुर यांना दिले. या प्रमाण पत्राच्या आधारे जिल्हाधिकारी, सोलापूर व तहसिलदार सोलापूर यांनी वादी श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या विरुध्द वसुलीची कार्यवाही सुरु केली.

याबाबत श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील हॅंड मेड पेपर महिला व्यावसायिक खादी ग्रामोद्योग सहकारी संस्था कोंडर पट्टा, माळशिरस जि. सोलापुर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी,खादी व ग्रामोदयोग मंडळ मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० मधील दिनांक २७/३/२०१७ रोजी अपिल केले.त्यावर कोणताही निर्णय न दिल्याने सदर संस्थेने मुख्य कार्यकारी अधिकारी,खादी व ग्रामोदयोग मंडळ मुंबई व इतर ३ याच्या विरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र. ९३९३/२०१७ दाखल केली. सदर याचिकेच्या अनुषंगाने दिनांक १३/१०/२०१७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.न्यायालयाने या प्रकरणी कलम २६(२) नुसार न्यायाधिकरण स्थापन केले आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली. त्यावर खादी मंडळाने असे न्यायाधिकरण स्थापन झाले नसल्याचे नमूद केले. त्यावर मा.न्यायालयाने या अधिनियमाच्या कलम २६(२) नुसार एकल

न्यायाधिकरणाची तात्काळ स्थापना करण्याबाबत दिनांक २७/११/२०१७ रोजीच्या सुनावणीत आदेशित केले. याच अनुषंगाने दिनांक १८/१२/२०१७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.न्यायालयाने दिनांक ९/१/२०१८ पर्यत शासनाने एकल न्यायाधिकरण स्थापन करण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी आदेश दिले. यास अनुसरुन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई अधिनियम १९६० मधील नियम २६(२) मधील तरतूदीनुसार एकल न्यायाधिकरण स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :--

मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० मधील कलम २६ च्या तरतूदी व महाराष्ट्र खादी ग्रामोदयोग मंडळ नियम १९७० नुसार एकल न्यायाधिकरणाची स्थापना याद्वारे करण्यात येत आहे.

सदर एकल न्यायाधिकरण हे खादी मंडळास येणे असलेल्या पैशांची जमीन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूली करेल व या प्राधिकरणाची कार्यकक्षा सर्व महाराष्ट्रासाठी असेल.

सदर एकल न्यायाधिकरणाचे अध्यक्ष सहसंचालक (उद्योग), उद्योग संचालनालय मुंबई हे राहतील.

एकल न्यायाधिकरण स्थापन केल्यानंतर या न्यायाधिकरणाच्या कामकाजाबाबतचा प्रशासकीय खर्च /मानधन खादी मंडळ शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या आर्थिक वर्षाच्या तरतूदीतून भागविल.

सदर शासन निर्णय विधी व न्याय विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३०/ई शाखा, दिनांक १५/१२/२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१८०२१६१४४७१६८२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहें.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajiv Madhav Ambikar

Digitally signed by Rajiv Madhav Ambikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4afb47d807935092599a3e28024dd3d3c461bad a30a950e81e666a02aad578f5, cn=Rajiv Madhav Ambikar
Date: 2018.02.16 14:53:32 +05'30'

(राजीव आंबीकर)
कार्यासन अधिकारी

प्रति,

१) मा.राज्यपालांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव,विधानभवन,मुंबई.
४) मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव,विधानभवन,मुंबई.
५) मा.अध्यक्ष,विधानसभा यांचे खाजगी सचिव,विधानभवन,मुंबई.
६) मा.सभापती,विधानपरिषद यांचे खाजगी सचिव,विधानभवन,मुंबई.
७) मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव,

८) मा.राज्यमंत्री(उद्योग) यांचे खाजगी सचिव
९) मा.मंत्री (सर्व) व मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
१०) मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव,सामान्य प्रशासन विभाग.मंत्रालय,मुंबई.
११) सचिव (लघु व मध्यम उद्योग) नवीन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर,मुंबई
१२) विकास आयुक्त उद्योग संचालनालय नवीन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर मुंबई.
१३) सहसंचालक (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर मुंबई
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ , मुंबई.
१५) अर्थ सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
१६) महालेखापाल ,(लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षा) महाराष्ट्र -१ मुंबई
१७) महालेखापाल ,(लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षा) महाराष्ट्र -२ नागपुर
१८)अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१९) निवासी लेखाधिकारी, मुंबई
२०) लेखा अधिकारी उद्योग संचालनालय,मुंबई
२१) वित्त विभाग (व्यय -१६ व अर्थ -१४) मंत्रालय मुंबई
२२) कार्यासन अधिकारी (प्रशासन -१ व ५) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
२३) निवडनस्ती (उद्योग-६)